CMYK

नामनिर्देशनपत्रातील माहितीसोबत संकेतस्थळावर कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही: राज्य निवडणूक आयोग >> पान 2

दर्जेदार विकासकामांनी नाशिक सुंदर, आधुनिक शहर करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 3

मेहकर नगरपरिषद निवडणूक : अध्यक्षपदासाठी दोन, सदस्यपदासाठी आठ उमेदवारांचे नामांकन दाखल >> पान 4

**सुविचार**

जग बदलायचे असेल तर आधी स्वतःला बदलवा. – महात्मा गांधी


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




हक चित्रपटाने यामीची कारकीर्द नवीन उंचीवर पोहोचली:दमदार अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्काराची मागणी, चित्रपट शाह बानो प्रकरणावर आधारित

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 100 ■ शुक्रवार, दि. 14 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## संभाजीनगरमध्ये एटीएसची कारवाई

### गाझा–पॅलेस्टाईन मदतीच्या नावाखाली फसवणुकीचा पर्दाफाश, १० लाखांची रक्कम परदेशात पाठवली

**छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरमध्ये दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) गाझा आणि पॅलेस्टाईनमधील लोकांना मदत करण्याच्या नावाखाली फसवणुकीचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात सय्यद बाबर अली सय्यद महमूद अली या व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याने धार्मिक आणि मानवतावादी भावनांचा गैरवापर करून नागरिकांची दिशाभूल केली असल्याचे उघड झाले आहे.**




एटीएसच्या तपासात समोर आले की, सय्यद बाबर अलीने 'अहमद राजा फाउंडेशन' या नोंदणीकृत नसलेल्या संस्थेच्या नावाने बनावट क्यूआर कोड तयार करून नागरिकांकडून निधी गोळा केला. याशिवाय 'राजा एम्पॉवमेंट फाउंडेशन' या नोंदणीकृत पण विदेशात निधी पाठवण्याचा अधिकार नसलेल्या संस्थेच्या नावानेही देणग्या जमा करण्यात आल्या. या रकमा तो स्वतःच्या बँक खात्यात जमा करून व्यक्तिगत आर्थिक फायदा मिळवत होता. त्याने 'राजा एम्पॉवमेंट फाउंडेशन' नावाचा यूट्यूब चॅनल सुरू करून त्याच्या माध्यमातून लोकांकडून ऑनलाइन देणग्या मागवण्याचा कट रचला होता.

तपासात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. सय्यद बाबर अलीने आपल्या खात्यातून ऋजत्रग्राछऊत्र्वए.उजच् या आंतरराष्ट्रीय देणगी पोर्टलवरून १४ ट्रान्झॅक्शनद्वारे तब्बल १०,२४,२२० इतकी रक्कम परदेशात पाठवली आहे. ही रक्कम नेमकी कुणाकडे आणि कोणत्या हेतूने पाठवण्यात आली, >> पान २

## राज्यात सात महिन्यांत चार लाख नावे वगळली

### १८ लाखाहून अधिक नवीन मतदार; निवडणूक आयोगाकडून आकडेवारी सादर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदारांची अद्ययावत यादी राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केली आहे. आयोगाने आपल्या अधिकृत संकेतस्थळावर १ जुलै २०२५ रोजीची अंतिम मतदार यादी प्रसारित केली असून, त्यानुसार राज्यातील एकूण मतदारसंख्या ९ कोटी ८४ लाख ९६ हजार ६२६ इतकी झाली आहे.




मागील सात महिन्यांच्या कालावधीत राज्यात १८ लाख ८० हजार ५५३ नव्या मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे, तर ४ लाख ९ हजार ४६ मतदारांची नावे मतदार याद्यांतून वगळण्यात आली आहेत. मागील विधानसभा निवडणुकीदरम्यान राज्यातील मतदारसंख्या ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ इतकी होती. त्यामध्ये यंदा जवळपास १४.७ लाख मतदारांची वाढ झाली आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये नव्या मतदार नोंदणीचा आढावा घेतल्यास ठाणे जिल्हा सर्वात पुढे असल्याचे आकडेवारीतून दिसते. ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक २ लाख ७१ हजार ६६६ नव्या मतदारांनी अर्ज दाखल केले. त्याच जिल्ह्यात ४५ हजार ८०० मतदारांनी आपली नावे वगळण्यासाठी अर्ज केले आहेत. पुणे जिल्ह्यात १ लाख ८२ हजार ४९० नवमतदारांची नोंदणी झाली आहे. मुंबई उपनगरात ९५ हजार ६३० नव्या मतदारांची नोंद झाली असून, ४४ हजार जणांची नावे मतदार याद्यांतून वगळली गेली आहेत.

मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी आयोगाकडे फॉर्म क्र. ६ द्वारे १६ लाख ८३ हजार ५७३ नागरिकांनी अर्ज दाखल केले. तसेच परदेशात राहणाऱ्या भारतीय >> पान २

## मुळशीत आणखी एक जमीन घोटाळा, महसूलमंत्री ॲक्शन मोडमध्ये घेतला मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्यावर पुण्यातील एका जमिनीशी संबंधित प्रकरणात जमीन घोटाळ्याचा आरोप करण्यात आला आहे, हे प्रकरण राज्यभरात चांगलंच तापलं. दरम्यान हे प्रकरण ताजे असतानाच आता पुणे जिल्ह्यातून आणखी एक जमीन घोटाळा प्रकरण समोर आले आहे. यामुळे खळबळ उडाली आहे. त्यानंतर आता राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ॲक्शन मोडवर आहेत. गैरव्यवहार प्रकरणी सहाय्यक दुय्यम निबंधकास निलंबीत करण्यात आले आहे.

पुण्याच्या हवेली येथील सहाय्यक दुय्यम निबंधक विद्या शंकर बडे सांगळे निलंबित करण्यात आले आहे. पुण्यात पशुसंवर्धन विभागाची १५ एकरच्या जमीन गैरव्यवहार प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. महसूल मंत्री बावनकुळे यांनी निलंबनाचे आदेश दिले आहेत. मंत्री बावनकुळेंकडून महसूल विभागाची झाडाझडती घेण्यास सुरुवात झाली आहे. गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईचा दट्टा बसण्यास सुरुवात झाली आहे.

## ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना आज 'महाराष्ट्र भूषण २०२४' पुरस्कार प्रदान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेल्या 'महाराष्ट्र भूषण २०२४' या पुरस्कारासाठी निवड झालेले ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना उद्या तो प्रदान केला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या उपस्थितीत उद्या शुक्रवार १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी नोएडा, उत्तर प्रदेश येथील त्यांच्या निवासस्थानी 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## गुजरात, केरळमार्गे सुपारी नागपुरात; वडधामनातही ४३५ पोती सडकी सुपारी जप्त

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** कळमना, पारडी पाठोपाठ बुधवारी वाडी पोलिसांनाही वडधामनात केलेल्या मोठ्या कारवाईत आणखी ४३५ पोती सडकी सुपारी पकडण्यात यश आले. तब्बल ६० लाखांची ही सडकी सुपारी चोरट्या मार्गाने इंडोनेशियातून आयात झाल्याची माहिती मिळत आहे. आयात शुल्क चुकवून आधी गुजरात आणि नंतर केरळ मार्गे ती सुपारी नागपुरात आली कशी, याचा आता पोलीस शोध घेत आहेत.

## भाजप ४१, राष्ट्रवादीला ८ जागा, राज्यात युतीची पहिली घोषणा, शिंदे गटाला मोठा धक्का

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची राजकीय समीकरण जुळवण्याची तयारी सुरू झाली आहे. स्थानिक पातळीवर मोठ्या घडामोडी घडण्याची चिन्हे दिसत आहेत. महायुतीमध्ये फुटीची पहिली ठिणगी पडली आहे. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने युतीची घोषणा केली असून शिवसेना शिंदे गटाला धक्का बसला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुकीत नवी राजकीय समीकरणे दिसण्याची चिन्हे आहेत. नगर परिषद, नगर पंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्यासाठी काही दिवसांचा अवधी असताना दुसरीकडे बहुतांशी ठिकाणी जागा वाटपांच्या चर्चा सुरू आहेत. अशातच राज्यात युतीची पहिली घोषणा करण्यात आली आहे. भाजप ४१ जागांवर आणि राष्ट्रवादी ८ जागांवर निवडणूक लढवणार आहे.

कुळगाव–बदलापूर नगरपालिकेत महायुतीतील



दोन घटक पक्ष असलेले भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने शिवसेनेला डावलत थेट स्थानिक युती केली आहे. या युतीतील जागावाटपाची प्रक्रिया पूर्ण झाली असून, नगराध्यक्षपद भाजपच्या वाट्याला जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला उपनगराध्यक्षपदासह आठ जागा आणि एक स्वीकृत नगरसेवकपद देण्यात आले आहे.


या नव्या समीकरणामुळे महायुतीतील तिसरा घटक असलेल्या शिवसेना शिंदे गटाला धक्का बसला आहे. राज्यात सत्तेत असूनही स्थानिक पातळीवर शिवसेना आणि भाजपमध्ये सुरू असलेले मतभेद आता उघडपणे समोर आले आहेत.

## पुण्याच्या नवले पुलावर अपघात

### दोन ट्रकला भीषण आग, दोघांमध्ये कार अडकल्याने ५ जणांचा मृत्यू; मृतांचा आकडा वाढण्याची भीती

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यातील वेगाने वाढणाऱ्या पुणे शहरात भीषण अपघाताची घटना घडली असून ५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. शहरातील नवले पुलावर हा अपघात होऊन दोन ते तीन वाहनांनी पेट घेतल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या दुर्घटनेत २० जण जखमी झाल्याचे समजते, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून अग्निशमन दलाच्या गाड्याही नवले ब्रीजवर पोहोचल्या आहेत. अपघातातील जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. दरम्यान, मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे.



शहरातील नवले ब्रीजवर सातत्याने अपघाताच्या घटना घडतात, आज पुन्हा एकदा येथे भीषण अपघाताची घटना घडली. ३ ते ४ गाड्यांची धडक बसल्याने हा अपघात झाला असून दोन कंटेनरच्यामध्ये >> पान २

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा घात करणारी पिपाणी निवडणूक आयोगाकडून कायमची हद्दपार

### शशिकांत शिंदे म्हणाले, 'तर आज महाराष्ट्रातील चित्र नक्कीच वेगळं असतं!'

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** अजित पवार यांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादीची दोन शकले झाली. यामध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीला घड्याळ चिन्ह मिळालं, तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला तुतारी वाजवणारा माणूस मिळाला. मात्र अपक्षांना मिळालेल्या पिपाणी या साधर्म्य असणाऱ्या चिन्हामुळे मोठा फटका राष्ट्रवादीला बसला. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला दोन निवडणुकीत दणका बसल्यानंतर आता निवडणूक आयोगाकडून हे चिन्ह रद्दबातल करण्यात आलं आहे. निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आनंद व्यक्त करतानाच निवडणूक आयोगाला खोचक टोला लगावला आहे. त्यांनी ट्विट करत प्रतिक्रिया देत तुतारी चिन्ह कायमचं वगळल्याबद्दल निवडणूक आयोगाचे आभार मानताना खडे बोल सुद्धा सुनावले आहेत.

शशिकांत शिंदे यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या चिन्हामुळे कार्यकर्त्यांना आणि मतदारांना मोठा गोंधळ निर्माण झाला, त्याची राजकीय किंमत पक्षाला चुकवावी लागली होती. हा निर्णय जर आधीच घेतला गेला असता, तर आज महाराष्ट्रातील आणि देशातील राजकीय चित्र नक्कीच वेगळं असतं. शेवटी, उशिरा सुचलेलं शहाणपण असं याला म्हणावं लागेल. निवडणूक चिन्हातून 'पिपाणी (ट्रम्पेट)' हे चिन्ह कायमचे वगळल्याबद्दल निवडणूक आयोगाचे आभार! हा निर्णय लोकशाही आणि स्वच्छ निवडणूक प्रक्रियेसाठी






एक सकारात्मक पाऊल आहे, असं त्यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटलं आहे.

पिपाणी आणि तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हांमध्ये असलेल्या साधर्म्यामुळे लोकसभा निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवारांनी मोठ्या प्रमाणामध्ये मते मिळवली होती. इतकेच नव्हे तर शशिकांत शिंदे यांनी सुद्धा सातारा लोकसभा मतदारसंघातून उदयनराजे भोसले यांच्या विरोधात शड्डू ठोकला होता. मात्र पिपाणी चिन्हामुळे शिंदे यांना पराभवाला सामोरे जावं लागलं. इतकेच नव्हे, तर या संदर्भात उदयनराजे यांनी सुद्धा जाहीरपणे भाष्य केलं होतं. असाच प्रकार बीड लोकसभेला सुद्धा घडला होता. त्यामुळे आता पिपाणी हे चिन्ह निवडणूक आयोगाकडून कायमस्वरूपी रद्दबातल करण्यात आल्याने शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा दिलासा मिळाला आहे.




CMYK

# नामनिर्देशनपत्रातील माहितीसोबत संकेतस्थळावर कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही: राज्य निवडणूक आयोग

## शनिवार दि. १५ रोजी देखील नामनिर्देशनपत्र स्वीकारणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता संकेतस्थळावर फक्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातीलच माहिती भरणे आवश्यक आहे. त्यासोबत कोणतीही कागदपत्रे सादर (अपलोड) करण्याची आवश्यकता नाही. संकेतस्थळावर संपूर्ण माहिती भरलेल्या नामनिर्देशनपत्राची आणि शपथपत्राची छापील प्रत (प्रिंटआऊट) घेऊन व त्यावर स्वाक्षरी करून आवश्यक कागदपत्रांसह तो संपूर्ण संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करणे आवश्यक आहे, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.




राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता नामनिर्देशपत्र दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने https://mahasecelec.in हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करून नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. परिपूर्ण माहिती भरल्यानंतर संकेतस्थळावरून त्याची मुद्रित प्रत काढून त्यावर उमेदवाराची स्वत:ची व सूचकांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या मूळ प्रतीसह अन्य आवश्यक कागदपत्रांचा (उदा. नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नादेय प्रमाणपत्र, शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र किंवा स्वयं घोषणापत्र, निवडणुकीसाठी बँक खात्याचा तपशील, राखीव जागांवरील उमेदवार असल्यास जात प्रमाणपत्र, पक्षाचा उमेदवार असल्यास 'जोडपत्र- १' किंवा 'जोडपत्र- २' इत्यादी) संपूर्ण संच विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे बंधनकारक आहे.

इच्छुक उमेदवारांना नोंदणीसाठी सुरुवातीपासून सुरू केलेले संकेतस्थळ १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत २४ तास सुरू असेल. तोपर्यंत त्यावर इच्छुक उमेदवारांना कोणत्याही वेळी नोंदणी करता येते व नोंदणी करताना तयार केलेला लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्याकडे जपून ठेवावा लागतो. कारण नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरण्यासाठी ते आवश्यक असते. सही केलेल्या प्रिंटआऊटसह आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रांचा संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित मुदतीत म्हणजे १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांसह नामनिर्देशनपत्र शनिवारी, १५ नोव्हेंबर २०२५ या सुटीच्या दिवशीसुद्धा स्वीकारण्यात यावेत, अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, रविवारी (ता. १६) ते स्वीकारण्यात येणार नाहीत. इच्छुक उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचेही निर्देश सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना देण्यात आले आहेत, असे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळविले आहे.

## क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे

आज १४ नोव्हेंबर, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी साताराचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# पत्नी असलेल्या राजकीय पक्षाकडे पतीचा 'स्वाभिमानी' प्रस्ताव; युती न झाल्यास स्वबळावर लढणार!

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील दहा नगरपरिषद आणि दोन नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचं राजकारण तापलं आहे. या निवडणुकीत अमरावतीच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आमदार रवी राणा आणि त्यांच्या पत्नी, भाजपा नेत्या नवनीत राणा हे एकमेकांविरोधात उभे ठाकण्याची शक्यता चर्चेचा विषय ठरत आहे.

**आमदार राणांचा भाजपाला प्रस्ताव :** अमरावतीमध्ये आमदार रवी राणा यांनी युवा स्वाभिमान पक्षाची कोअर कमिटी बैठक घेतली. या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कशा पद्धतीनं लढायच्या यावर सविस्तर चर्चा झाली. युवा स्वाभिमान पक्षानं भाजपाचे निवडणूक प्रभारी आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना युतीसाठी प्रस्ताव दिला आहे.

**तर स्वबळावर लढू :** ''युतीसाठी आम्ही भाजपाकडं प्रस्ताव पाठवला आहे. दोन दिवसांत प्रतिसाद मिळाला नाही, तर आम्ही स्वबळावर निवडणूक लढण्यास सज्ज आहोत. आमची सर्व तयारी पूर्ण झाली आहे,'' अशी प्रतिक्रिया युवा स्वाभिमान पक्षाचे प्रवक्ते नाना आमले यांनी दिली. आमले यांच्या या वक्तव्यामुळं राणा दाम्पत्याचा राजकीय निर्णय आता भाजपाच्या प्रतिसादावर अवलंबून राहणार आहे.

**राणा दाम्पत्याचं राजकीय समीकरण :** रवी राणा हे युवा स्वाभिमान पक्षाचे संस्थापक, अध्यक्ष आहेत. त्यांच्या पत्नी नवनीत राणा यांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपामध्ये प्रवेश केला होता. भाजपाकडून लोकसभेची उमेदवारी मिळावी म्हणून त्यांनी थेट पक्षात प्रवेश केला होता. काही भाजपा नेत्यांनी त्यांच्या प्रवेशाला विरोध केला होता. परंतु पक्षश्रेष्ठींच्या निर्णयानंतर नवनीत राणा यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडली. राजकारणात राणा दाम्पत्य नेहमीच चर्चेचा विषय ठरलं आहे. नवनीत राणा यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतरच पक्षातील काही स्थानिक नेते अस्वस्थ झाले होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी युवा स्वाभिमान पक्षानं आता भाजपाकडेच युतीचा प्रस्ताव पाठवला आहे.

**भाजपाकडून काय निर्णय? :** भाजपाकडून या प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला जाईल, हे पाहणं औत्सुक्याचं ठरेल. जर युती झाली, तर राणा दाम्पत्य एकाच आघाडीवरून लढताना दिसतील. मात्र, युती न झाल्यास अमरावती जिल्ह्यात राणा विरुद्ध राणा असा अनोखा सामना रंगू शकतो.

**स्थानिक राजकारणातील नवीन समीकरणं :** या घडामोडींमुळं अमरावतीच्या राजकारणात नवं समीकरण तयार होण्याची चिन्हं दिसत आहेत. भाजपा आणि युवा स्वाभिमान पक्षातील युती झाली नाही. तर मतविभाजनाची शक्यता निर्माण होईल. दोन्ही पक्ष स्वबळावर मैदानात उतरल्यास जिल्ह्यातील सत्ता समीकरणात मोठे बदल घडू शकतात.

# तानाजी सावंतांच्या भावाचा भाजप प्रवेश पुढे ढकलला, नेमकं कारण काय?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि सोलापूर जिल्ह्याचे माजी संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांचा भाजपमध्ये होणारा अपेक्षित पक्षप्रवेश अचानक पुढे ढकलण्यात आला आहे. त्यामुळे सोलापूर (एदतरज्ली) जिल्ह्यात तसेच राज्याच्या राजकीय वतुर्ळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. शिवाजी सावंत हे राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे ज्येष्ठ बंधू असून, दोघांमधील सुरू असलेल्या कौटुंबिक आणि राजकीय मतभेदांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश विशेष महत्त्वाचा मानला जात होता.



मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर जिल्ह्यातील शिवाजी सावंत हे शिंदे गटातील प्रभावी आणि वरिष्ठ नेते मानले जातात. संपूर्ण जिल्ह्यात त्यांचा मजबूत संपर्क व प्रभाव लक्षात घेऊन भाजपकडून त्यांना पक्षात सामावून घेण्यासाठी काही काळापासून प्रयत्न सुरू होते. दोन दिवसांपूर्वी पंढरपूर येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शिवाजी सावंत यांच्याशी सविस्तर चर्चा केली होती. त्यानंतर भाजपमध्ये नुकतेच प्रवेश केलेले माजी आमदार बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे यांच्याशी देखील सावंत यांची बैठक झाली होती. या चर्चेनंतर तिघांची एकत्रित बैठक घेण्यात आली आणि सावंत यांचा भाजप प्रवेश निश्चित झाल्याचे जवळपास ठरले होते.

तथापि, आज गुरुवारी नियोजित असलेला भाजप प्रवेश अचानक पुढे ढकलण्यात आला. या घडामोडीनंतर विविध चर्चा रंगू लागल्या असून, तानाजी सावंत यांचा प्रभाव आणि हस्तक्षेप यामागे कारणीभूत असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे. राज्याच्या सत्तांतर प्रक्रियेदरम्यान तानाजी सावंत यांनी शिंदे गटाच्या भूमिकेला बळकटी दिली होती. त्या काळात देवेंद्र फडणवीस यांच्याशी त्यांचे निकटचे संबंध निर्माण झाले. त्यामुळे भाजपने तानाजी सावंत यांच्या भूमिकेचा मान राखत त्यांच्या बंधूंचा प्रवेश सध्या थांबवला, अशी चर्चा सुरु झाली आहे.

शिवाजी सावंत यांचा भाजप प्रवेश रखडल्याने सोलापुरातील राजकीय समीकरणे पुन्हा ढवळून निघण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सावंत हे सोलापूर जिल्ह्यातील शिवसेनेचे अनुभवी नेते असून, त्यांच्या पक्षांतरामुळे स्थानिक स्तरावर शिंदे गटाला मोठा फटका बसू शकतो, असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केला आहे. सध्या दोन्ही सावंत बंधूंच्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर पुढील काही दिवसांत या घडामोडी कोणत्या वळणावर जातात, याकडे राज्याचे राजकीय लक्ष लागले आहे.

पान १ वरून...

## संभाजीनगरमध्ये एटीएसची कारवाई

याचा तपास आता एटीएस आणि स्थानिक पोलीस संयुक्तपणे करत आहेत. या कारवाईमुळे परदेशी निधीच्या नावाखाली फसवणूक आणि संशयास्पद व्यवहारांच्या जाळ्याचा मोठा पर्दाफाश झाल्याचे मानले जात आहे. एटीएसकडून पुढील काही दिवसांत आणखी खुलासे होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, दिल्लीमध्ये लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार स्फोटानंतर महाराष्ट्रात अलर्ट देण्यात आला आहे. त्याच पार्श्र्वभूमीवर महाराष्ट्र एटीएसकडून राज्यात ठिकठिकाणी शोधमोहीम राबवण्यात येत आहे. दिल्ली स्फोटाचे धागेदोर महाराष्ट्रात असण्याच्या संशयावरून शोधमोहीम हाती घेण्यात आली आहे. स्फोट प्रकरणात अटक केलेल्या चार डॉक्टरांचे महाराष्ट्रात काही संबंध आहेत का? याचा देखील शोध सुरू आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरं आणि गावांमध्ये एटीएसची शोधमोहीम सुरू आहे. अटकेतील डॉक्टर महाराष्ट्रात आले होते का? या अनुषंगाने एटीएसकडून तपास केला जात आहे. डॉ. मुजम्मिल शकील, डॉ. आदिल अहमद, डॉ. अहमद सय्यद आणि डॉक्टर शाहीन शाहिद या चार जणांना अटक करण्यात आली आहे.

## राज्यात सात महिन्यांत

नागरिकांसाठी असलेल्या फॉर्म क्र. ६ अ द्वारे देखील काही अर्ज प्राप्त झाल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान 'तुतारी वाजवणारा माणूस' या पक्षचिन्हाशी साधर्म्य असलेल्या 'पिपाणी (ट्रम्पेट)' या स्वतंत्र चिन्हामुळे फटका बसल्याची तक्रार होती. या संदर्भात शरद पवार गटाने निवडणूक आयोगाकडे 'पिपाणी' हे चिन्ह गोठवण्याची मागणी केली होती. अखेर आयोगाने ती मागणी मान्य करत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीच्या मुक्त चिन्हांच्या यादीतून 'पिपाणी' हे चिन्ह वगळले आहे. 'पिपाणी' हे चिन्ह आयोगाच्या यादीत 'तुतारी' या नावाने नोंदवले गेले होते. या नामसाधर्म्यामुळे मतदारांमध्ये गोंधळ निर्माण झाला आणि शरद पवार गटाच्या उमेदवारांना मिळणारी मते अपक्ष उमेदवारांकडे वळल्याचा दावा राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाकडून करण्यात आला होता. त्या पार्श्र्वभूमीवर पवार गटाने निवडणूक आयोगाला हे चिन्ह वगळण्याची औपचारिक मागणी केली होती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांपूर्वी आयोगाने आपल्या १९४ मुक्त चिन्हांच्या यादीतून 'पिपाणी (ट्रम्पेट)' हे चिन्ह वगळण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शरद पवार गटाला मोठा दिलासा मिळाला आहे.

## पुण्याच्या नवले पुलावर अपघात

एक कार जळत असल्याचं दिसून आलं. या कारमधून एक कुटुंब प्रवास करत होते, अशीही प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, अपघाताच्या घटनेनंतर अग्निशमन दल व पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. तर, काही काळासाठी नवले पुलासह रस्त्यावरची वाहतूक थांबवण्यात आली आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्यात आलं असून सध्या मदत व बचाव कार्य सुरू आहे.नवले पुलावरील हा अपघात इतका भीषण होता की, गाड्यांची एकमेकांना धडक झाल्यानंतर दोन ते तीन वाहनांनी पेट घेतला. यामध्ये अनेकजण जखमी आहेत. सध्या पुणे आणि पीएमआरडीए अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आहे. या अपघातानंतर अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. तर काही काळासाठी रस्त्यावरची वाहतूक थांबवण्यात आली आहे. अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आहेत आणि आगीवर नियंत्रण मिळवला आहे सध्या बचाव कार्य सुरू आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# दर्जेदार विकासकामांनी नाशिक सुंदर, आधुनिक शहर करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कुंभमेळ्यासाठी साडेपाच हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमिपूजन

**दैनिक आपला विदर्भ**



**नाशिक/प्रतिनिधी :** येत्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आणि नाशिक महानगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने होणाऱ्या नाशिक शहरातील पाच हजार ६५७ कोटी ८९ लाख रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे दर्जे दार आणि पारदर्शक पद्धतीने करून नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करणार, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

ठक्कर मैदान येथे आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, क्रीडा मंत्री ड. माणिकाराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार शोभा बच्छाव, मुख्य सचिव राजेशकुमार व नगर विकास विभागाचे अपर सचिव गोविंदराज (दूरदृश्यप्रणालीद्वारे), जिल्ह्याचे पालक सचिव एकनाथ डवले, नाशिक-त्र्यंबकेश्र्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.प्रविण गेडाम, आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते.

मागील कुंभमेळ्याचे चांगले आयोजन करण्यात आल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यावेळी कुंभमेळ्यात गतवेळेपेक्षा पाचपट अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. भाविकांची व्यवस्था, सुरक्षा, पर्वस्नान व अमृतस्नानाचे नियोजन आणि या सोहळ्याचा मुळ गाभा असलेल्या आध्यात्मिकतेचा अनुभव भाविकांना देण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी नाशिकमध्ये केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यामतून २० हजार कोटींपेक्षा अधिकची कामे सुरू करण्यात येत आहेत. कुंभमेळ्यापर्यंत ही रक्कम २५ हजार कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभ्या राहतील. शासनाच्या सर्व विभागांनी समन्वयाने कामे केल्याने मोठ्या प्रमाणात कामाला सुरूवात होत आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्र्वरच्या नागरिकांनीही यासाठी सहकार्य केले आहे, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, कुंभमेळ्यासाठी रस्ते, महामार्ग दुरूस्ती, पिण्याच्या पाण्याची योजना, गोदावरीचे पावित्र्य राखणे, चांगल्या घाटांची निर्मिती, जुन्या मंदिरांचे पुनरुज्जीवन, विकासकामे करताना गोदाघाटाचे पुरातन रुप कायम ठेवणे यावर भर देण्यात येत आहे. नाशिक हे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने इथे होणारी विकासकामे पुढील २५ वर्ष टिकली पाहिजेज आणि नाशिक पर्यटनक्षेत्र म्हणून विकसित व्हावे, असा प्रयत्न या माध्यमातून होत आहे. या विकासकामांच्या माध्यमातून नाशिकचे रुप बदलेल आणि शहराच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

कुंभमेळ्यात भाविकांचे व्यवस्थापन व्हावे यासाठी बाह्य वर्तुळाकार मार्ग तयार होत असून भविष्यातल्या नाशिकसाठी याचा फायदा होणार आहे. नाशिक विमानतळावर नवीन टर्मिनल इमारत, रेल्वे सुविधा, बस स्थानकाची सुविधा, स्मार्ट सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून आधुनिक नाशिक शहर विकसीत करण्यावर भर देण्यात येत आहे. एकूण बाराशे एकर जागा अधिग्रहीत करून त्यावर कुंभाचे आयोजन करण्यात येत आहे. भविष्यातही कुंभच्या आयोजनात कुठलीही अडचण राहणार नाही असा प्रयत्न आहे. कुंभमेळ्याची ही सर्व कामे पारदर्शी पद्धतीने होतील अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. विकासकामे करताना नागरिकांचे नुकसान होऊ देणार नाही, तथापि सामाजिक कार्य समजून नागरिकांनीही विकासकामांना सहकार्य करावे. साधूसंतांनी शासनाला कुंभमेळा आयोजनासाठी मार्गदर्शन करावे, त्यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

सिंहस्थ कुंभमेळ्यात ७५ वर्षानंतर त्रिखंड योग जुळून आल्याने हे कुंभपर्व विशेष असून ते २८ महिने चालणार आहे. ४० ते ४२ पर्वस्नान आणि महत्त्वाचे अमृतस्नान या कुंभात होणार आहे. प्रयागराज कुंभमेळ्यात देशातील सांस्कृतिक पुर्नजागरणाच्या मोहिमेची प्रचिती आली. याच कुंभच्या परंपरेत नाशिक आणि त्र्यंबकेश्र्वरचा कुंभमेळा महत्त्वाचा मानला जातो. प्रयागराज येथे १५ हजार हेक्टर जागा असून नाशिक-त्र्यंबकेश्र्वर येथे ५०० एकर जागा आहे. अत्यंत कमी जागा असूनही २०१५ मध्ये कुंभमेळ्याचे चांगले आयोजन करण्यात आले. यावेळीदेखील असे आयोजन व्हावे, यादृष्टीने शासन आणि प्रशासनाने त्यासाठी आवश्यक तयारी सुरू केली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**कुंभमेळ्याने नाशिक जगाच्या नकाशावर झळकेल - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे नाशिकचा चेहरामोहरा बदलेल आणि शहराचा नियोजनबद्ध विकास होईल. त्यादृष्टीने प्रशासनाने चांगली तयारी केली आहे. कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी राज्य शासनाने फार पूर्वीपासून तयारी सुरू केली आहे. नाशिकची जगाच्या नकाशावर ओळख निर्माण करणारा हा सोहळा असेल. कुंभपर्व ही नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करण्याचीही संधी आहे.

सोहळ्याकरिता दर्जेदार सुविधा निर्माण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. सोहळा यशस्वी करण्यासाठी उत्तम नियोजन आणि अंमलबजावणीची आवश्यकता असून त्यादृष्टीने प्रशासन कार्यरत आहे. मोठ्या संख्येने भाविक येणार असल्याने सुरक्षेची मोठी जबाबदारी शासन-प्रशासनावर असून त्यासाठी आवश्यक तयारी करण्यात येत आहे. सुरक्षेसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा उपयोग करण्यात येणार आहे. गोदावरीला दक्षिण गंगा म्हटले जाते आणि विकासकामांच्या शुभारंभाच्या माध्यमातून नाशिक शहरात विकासाची गंगा येत आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

साधूग्राम, स्वच्छता व्यवस्था, रामकुंड आणि कुशावर्तचे पावित्र्य आदी सर्व बाबींवर लक्ष देण्यात येत आहे. कुंभमेळ्याच्या प्रसिद्धीसाठी डिजीटल माध्यमांचा उपयोग करण्यात येणार आहे. येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. उत्तम नियोजनाद्वारे कुंभमेळ्याचा लौकीक जगभर पोहोचेल, असा विश्र्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

**स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित कुंभमेळा होणार - कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन**

कुंभमेळ मंत्री गिरीश महाजन म्हणाले, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने विविध विकासकामांचा शुभारंभ होत आहे. मागील कुंभमेळ्याची दखल घेवून अमेरिकेत शासनाचा सन्मान करण्यात आला होता. यावर्षीदेखील दीड वर्षांनी नाशिक-त्र्यंबकेश्र्वरमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याचा लौकीक जगभरात पोहोचणाार आहे. यावेळी गतवर्षीपेक्षा अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्र्वर येथे प्रयागराजच्या तुलनेत जागा कमी असल्याने येणारा कुंभमेळा सुरक्षित व्हावा, यासाठी शासन आणि प्रशासन आतापासून वेगाने काम करीत आहे. स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित कुंभमेळा होण्याच्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. कायदा-सुव्यवस्थेचे वातावरण कायम ठेवण्यासाठी पोलीस दलातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. नाशिक शहराचा विकास, पर्यटनाला चालना आणि रोजगार निर्मितीसाठी कुंभमेळा महत्वाचा असून साधू-महंत आणि नाशिकरांनी सहभागी व्हावे, घरचे कार्य समजून देशभरातून येणाऱ्या भाविकांच्या आदरातिथ्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन मंत्री महाजन यांनी केले.

प्रास्ताविकात डॉ.गेडाम यांनी कुंभमेळ्यानिमित्त करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांची माहिती दिली. सुरक्षित आणि स्वच्छ कुंभमेळा करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक, साधू-महंत, पर्यटक आणि नाशिकच्या नागरिकांना अद्वितीय धार्मिक, सांस्कृतिक पर्यटनाची अनुभूती मिळेल, यादृष्टीने प्रशासन कार्यरत आहे. नाशिकच्या पायाभूत सुविधा आणि पर्यटनासह ही पर्वणी सर्वांगिण विकासाला चालना देणारी असेल असे प्रकल्प विचाराधीन आहेत. डिजीटल आणि अत्याधुनिक कुंभ करण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा उपयोग करण्यात येत आहे. सीसीटीव्ही प्रकल्पासह ५ हजार ६५७ कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे भूमिपूजन होत आहे. भारत सरकारकडून रेल्वे, रस्ते आदी विविध कामांसाठी ९ हजार ३८२ कोटी रुपयांचे प्रकल्प विविध स्तरावर प्रगतीपथावर आहेत. राज्य शासनाकडूनही पुढील टप्प्यात आणखी १० हजार कोटी रुपयांचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. कामांना गती देण्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. विकासकामे मार्च २०२७ पर्यंत पूर्ण झाल्यानंतर नाशिकमध्ये विकासाचा अमृतकुंभ येईल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला विविध आखाड्याचे साधू-महंत, आमदार किशोर दराडे, पंकज भुजबळ, ड. राहुल ढिकले, आमदार दिलीप बनकर, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, आमदार राहूल आहेर, मंगेश चव्हाण, दिलीप बोरसे, विशेष पोलीस निरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, एमएमआरडीए आयुक्त जलज शर्मा, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, कुंभमेळा अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे आदी उपस्थित होते.

**विकासकुंभाची अशी होणार सुरूवात**

नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नियोजित विकासकामांचे भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. या कामांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे २ हजार २७० कोटी रुपये, तर नाशिक महानगरपालिकेतर्फे ३ हजार ३३८ कोटी रुपयांची विकास कामे प्रस्तावित आहेत.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे व्यापक पायाभूत सोयीसुविधा उभारणी, सुरक्षा व्यवस्थेचे बळकटीकरण, स्वच्छता, व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थेचे सुलभीकरण, धार्मिक पर्यटनाच्या सोयीसुविधांचे अद्ययावतीकरणासाठी महत्त्वपूर्ण प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. या कामांसाठी एकूण ५ हजार ६५७ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित आहे.

मुख्य कामांमध्ये नवीन पूल बांधण्यासाठी ९४ कोटी ८७ लाख रुपये, नाशिक शहरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वयानासाठी ४३६ कोटी ५६ लाख रुपये, नाशिक शहरात मल:निस्सारण प्रकल्प उभारणीसाठी १ हजार ४७५ कोटी ५० लाख रुपये, नाशिक शहरात गोदावरी काठावर रामकाल पथनिर्मितीसाठी १२० कोटी ८८ लाख रुपये, नाशिक महानगरपालिकेतर्फे ६८४ कोटी रुपये किंमतीची पाणी पुरवठा योजना विस्ताराचे काम प्रस्तावित आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दोन हजार २७० कोटी ६० लाख रुपये किमतीचा रस्ते विकासाचा मोठा पायाभूत प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांमुळे कुंभमेळ्यानिमित्त होणाऱ्या गर्दीचे नियंत्रण आणि व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थापन, पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती, सुरक्षा, स्वच्छता, पाणीपुरवठा, पर्यटनाच्या सुविधा व धार्मिक वारसा संरक्षणात मोठी भर पडणार आहे.


## शब्दकोडे क्र. 08

आडवे शब्द

१. पहारेकरी ६. टप्प्या-टप्प्याचा प्रवास १२. माळ, हार १३. नडलेला, गरजू १४. डाळीचे कालवण १५. सांभाळ, संगोपन १७. गवताचे रुंद पान १८. वेल २०. शंभर २२. प्रचंड २४. आई २५. गगन २७. हद्दपार, वगळलेला २८. कोय २९. रोटीचे एक धान्य ३०. एक त्रिदल ३१. आवेशाने पुढे जाणे ३३. पोट ३४. सैन्याचा मालपुरवठा ३६. चिखलाची भुसभुशीत जमीन ३७. श्रीकृष्णाचे एक नाव ३८. रममाण, निमग्न ४०. कबूतर ४१. पुष्कळ ४३. हिंदुस्थानी ४५. भित्रा ४८. एक महाकाय प्राणी ४९. कुंभाराची भट्टी ५१. आत्मियता, करुणामय प्रेम ५२. पुरुष ५३. आकडेमोडीचे शास्त्र ५५. उद्योगी माणसाचा 'शत्रू' ५६. ठाकरे पुत्र ५८. भडीमार ५९. भीती ६१. रक्ताचा नात्यातील ६२. रतिचा पती ६५. आमनेसामने ६८. समुद्र ७०. ग्रामीण बोलीत तेव्हा ७१. जिम्मेदारी ७२. वेळ घालवणे ७४. अभिनेता ७५. त्वरित ७६. चप्पल ७७. गाय ७८. परंतु

उभे शब्द

१. जीभ. जिव्हा २. गाढव ३. निकट ४. दरवाजा ५. रात्र ६. हेतू-कारण ७. अंगावरील बारीक केस ८. फिर्याद, अर्ज ९. वाळवंट १०. धरण, सरोवर, विहीर इ. ११. संगीतातील एक राग १६. नकला करणारा १७. सरसरीत १९. धातूचा धागा २१. मध २२. सततचे नामस्मरण २३. प्रत्येक वर्षी २४. बिनविजेचा 'फ्रीज' २५. आपला परका अशी भावना २६. कपाळ २८. स्वाभिमानी २९. इंग्रजी आई ३१. कमीजबरोबरचे एक वस्त्र ३२. दात ३३. अगरबत्ती ३५. वेळ, फुरसत ३६. डोंगराचा तुटलेला कडा ३९. जरच्या बरोबरचा शब्द ४२. दाक्षिणात्य आमटी ४४. धनुष्यबाण ४६. भरीव नसलेले ४७. शिखराचे टोक ४९. व, आणखी ५०. कडक व चिवट ५२. एक क्षार ५४. फणसातील खाद्यभाग ५६. नाहक ५७. न्यूनता, कसर ६०. रसाळ ६१. मंत्रीमंडळ ६३. औषध ६४. हाकाटी, आरडाओरड ६६. मराठीत बाथरूम ६७. टोळी, सैन्याची तुकडी यांचा प्रमुख ६८. हिंमत, धैर्य ६९. तीव्र ऊन ७३. विहीर ७४. शर्त



### शब्दकोडे क्र. 07 चे उत्तर

आडवे उत्तर

१.दीडशहाणा ४.तासभर ७.बेसुमार ९.नर १०.शराब ११.जकात १३.चाणक्य १४.बनकर १६.आरमार १७.टाळी १८.तात २०.श्वास २३.पळसाला तीन पाने २६.लघुकोन २८.काम २९.खासगी ३१.रजनीकर ३३.कस ३५.सनई ३६.रमा ३७.कमालकिमान ३८.उदास ४०.वीर ४१.नवा ४३.संबंध ४५.दामोदर ४७.तापट ४९.दीर ५०.नवनीत ५३.रण ५५.माग ५६.रडतराऊत ५७.नीलकंठ ५९.पुकारणे ६१.पकडणे ६३.आईवडील ६६.कर्मधर्मसंयोग ६९.द्वतराजी ७०.तग ७१.कणकण

उभे उत्तर

१.दीन २.डरकाळी ३.हालचाल ४.तारा ५.सबब ६.रजक ८.मागोमाग १०.शक्यता १२.कार १५.नवसागर १६.आसपास १७.टाकी १९.तप २०.श्वान २१.सलगी २२.चकोर २४.तीरकमान २५.समई २७.नजरसमोर २८.कानन २९.खार ३०.जमावबंदी ३२.करवीरनगर ३४.सलवार ३५.समानता ३९.दादा ४२.बटण ४४.धरणीकंप ४६.पनीर ४८.परत ५१.तडक ५२.मीराबाई ५४.धनी ५५.माका ५८.ठकबाजी ५९.पुणेकर ६०.कालवण ६२.वसंत ६३.आग ६४.वहाण ६५.खंत ६७.धक्का ६८.योग

# मेहकर नगरपरिषद निवडणूक : अध्यक्षपदासाठी दोन, सदस्यपदासाठी आठ उमेदवारांचे नामांकन दाखल

## थंडीच्या दिवसांत राजकीय तापमान वाढले; १४ नोव्हेंबरपासून उमेदवारांची गर्दी अपेक्षित

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय हालचालींना चांगलाच वेग आला आहे. थंडीच्या सकाळी निवडणूक कार्यालयाबाहेर कार्यकर्त्यांची लगबग दिसत असून नामांकन दाखल करण्यासाठी उमेदवारांची धावपळ सुरू झाली आहे. १३ नोव्हेंबर रोजी एकूण १० उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले, यात अध्यक्षपदासाठी २ आणि सदस्यपदासाठी ८ उमेदवारांचा समावेश आहे.

नगरपरिषदेत एकूण १३ प्रभागांतून २६ नगरसेवकांची निवड होणार आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबरपासून सुरू झाली असली तरी सुरुवातीचे तीन दिवस शांततेत गेले. मात्र चौथ्या दिवशी वातावरण चैतन्यमय झाले आणि नामांकन प्रक्रियेला वेग आला.




अध्यक्षपदासाठी शिवसेना (शिंदे गट) कडून दोन्ही उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. उमाळकर अजय अरविंद शिवसेना (शिंदे गट) वाळूकर सुरेश विश्वनाथ शिवसेना (शिंदे गट) दोन्ही उमेदवार एकाच पक्षाचे असल्याने पुढील काही दिवसांत पक्षांतर्गत चर्चेला वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नगरसेवक पदासाठी आठ उमेदवारांनी आपली उमेदवारी नोंदवली असून त्यात विविध पक्ष व अपक्षांचा समावेश आहे

प्रभाग १ : चांगाडे मधुकर कुंडलिकराव शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)
प्रभाग २ : वाळूकर सुरेश विश्वनाथ शिवसेना (शिंदे गट)
प्रभाग ३ : प्रभाकर शिवसेना
प्रभाग ४ : शहा तब्बमुमपरवीन उस्मान शहा काँग्रेस
प्रभाग ५ : नवरंगाबादी बेबीबाई भिका अपक्ष
प्रभाग ६ : खान मुनाफ उनमत काँग्रेस
प्रभाग ७ : शाह उस्मान शहा अब्दुल शहा अपक्ष
प्रभाग ८ : मोहम्मद जलीम मो. मोईन काँग्रेस

या उमेदवारांच्या नावांवरून स्पष्ट होते की काँग्रेस, शिवसेना (दोन्ही गट) आणि अपक्ष उमेदवारांमध्ये चुरस रंगणार आहे. निवडणुकीच्या काही दिवस आधीच पक्षांमध्ये उमेदवार निवडीसाठी बैठका सुरू झाल्या आहेत. शहरात राजकीय गणिते रंगू लागली असून संभाव्य युती, आघाड्यांबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. काही प्रभागांत दोन-दोन उमेदवार एकाच पक्षाकडून अर्ज दाखल करत असल्याने अंतर्गत गटबाजीही उफाळून येण्याची शक्यता आहे. १० नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या नामांकन प्रक्रियेला सुरुवातीला थंड प्रतिसाद मिळाला होता. पण १३ नोव्हेंबर रोजी एकाच दिवशी १० अर्ज दाखल झाले. आता केवळ तीन दिवस अर्ज दाखल करण्यासाठी उरले असल्याने १४ नोव्हेंबरपासून उमेदवारांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे.

निवडणूक आयोगाकडून अर्जांची छाननी, अर्ज माघार आणि अंतिम यादी जाहीर होण्याच्या टप्प्यांमुळे पुढील आठवड्यात मेहकरमध्ये राजकीय घडामोडींना वेग मिळेल, हे निश्चित आहे.

> थंडीच्या हंगामात शहराच्या राजकीय वातावरणाला उष्णता येताना दिसते आहे. प्रत्येक पक्ष आपले वर्चस्व टिकवण्यासाठी प्रयत्नशील असून, अपक्ष उमेदवार सुद्धा या निवडणुकीत निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. येत्या काही दिवसांत होणारे घडामोडी या निवडणुकीचे चित्र स्पष्ट करतील, एवढे मात्र नक्की.

## वृत्तविशेष...

### नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५; अध्यक्ष पदासाठी ५ तर सदस्यांसाठी ३३ नामनिर्देश पत्र दाखल

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सदस्य व अध्यक्ष पदांसाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. कार्यक्रमानुसार दि. १० नोव्हेंबर २०२५ पासून नामनिर्देशपत्र दाखल करणे सुरु झाले असून आतापर्यंत नगरपरिषद अध्यक्ष पदासाठी ५ तर सदस्यांसाठी ३३ नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे. नामनिर्देशन पत्र याप्रमाणे : बुलढाणा येथे नगरपरिषद सदस्यासाठी ३, चिखली येथे अध्यक्षासाठी १ व सदस्यासाठी ८, लोणार येथे अध्यक्षासाठी १, मलकापूर येथे सदस्यासाठी ६, मेहकर येथे अध्यक्षसाठी २ व सदस्यासाठी ८, नांदुरा येथे अध्यक्ष व सदस्यासाठी प्रत्येक १, शेगांव येथे सदस्यासाठी ६, सिंदखेड राजा येथे सदस्यासाठी १ असे एकूण नगरपरिषद अध्यक्ष पदासाठी ५ तर सदस्यासाठी ३३ नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे.

### आईकडून सततचा दुजाभाव, माझ्या मृत्यूनंतर तिला कडक शिक्षा करा; तरुण वकिलाने चिठ्ठी लिहित संपवलं जीवन, सोलापुरात खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर शहरात एका तरुण वकिलाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (१२ नोव्हेंबर) दुपारी घडली. सागर श्रीकांत मंद्रूपकर (वय ३२, रा. समर्थ सोसायटी, एसआरपीएफ कॅम्प, विजापूर रोड) असे मृत वकिलाचे नाव आहे. या घटनेने सोलापूरमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, ॲड. सागर मंद्रूपकर यांनी बुधवारी दुपारी आपल्या घराच्या पहिल्या मजल्यावर दोरीच्या साहाय्याने स्लॅबवरील लोखंडी हुकाला गळफास घेतला. काही वेळानंतर घरच्यांच्या लक्षात ही घटना आल्यानंतर त्यांनी त्यांना खाली उतरवून तात्काळ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, तेव्हाच डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

घटनास्थळावर पोलिसांना एक आत्महत्यापत्र मिळाले आहे. त्या चिठ्ठीत सागर यांनी लिहिले आहे की, ''आईकडून होणाऱ्या सततच्या दुजाभावामुळे मी आत्महत्या करत आहे. माझ्या आत्महत्येला ती जबाबदार आहे. माझ्या मृत्यूनंतर तिला कठोर शिक्षा करा.'' या मजकुरावरून कौटुंबिक कारणांमुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी ॲड. सागर मंद्रूपकर यांचा पोलिसांबरोबरही काही वाद झाला होता. हे प्रकरण सोलापूर बार असोसिएशनपर्यंत पोहोचले होते. त्या वादामुळे सागर मानसिक ताणाखाली होते का, याबाबत विविध चर्चा सुरू आहेत. पोलिसांनी या सर्व बाबींचा तपास सुरू केला असून आत्महत्येचे नेमके कारण समोर येणे बाकी आहे. तरुण वकिलाने आत्महत्या केल्याने सोलापूरमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

### हक चित्रपटाने यामीची कारकीर्द नवीन उंचीवर पोहोचली:दमदार अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्काराची मागणी, चित्रपट शाह बानो प्रकरणावर आधारित

**मुंबई/प्रतिनिधी :** नंतर यामी गौतमबद्दल सर्वजण का बोलत आहेत याचे एक कारण आहे. केवळ तिच्या दमदार अभिनयामुळे नाही, तर या पद्धतीने देखील पाहिले जात आहे की ती नेहमीच पात्र होती.

मध्ये, यामी तिच्या व्यक्तिरेखेत पूर्णपणे खोलात गेली आहे. प्रत्येक नजर, प्रत्येक थांबा खरा वाटतो. तिच्यात एक शांत तीव्रता आहे, जी तुम्हाला आकर्षित करते; ती तुमचे लक्ष वेधून घेत नाही, परंतु ती सहजतेने धरून ठेवते. आजच्या काळात असे काम दुर्मिळ आहे – प्रामाणिक, घाईघाईने आणि खोलवर जाणवणारे. तिला राष्ट्रीय पुरस्कार मिळावा असे अनेक जण म्हणत आहेत यात आश्चर्य नाही.

या क्षणाला आणखी खास बनवणारी गोष्ट म्हणजे त्यातील नैसर्गिकता. यामी इथे एकाच वेळी पोहोचली नाही. हा एक स्थिर आणि संथ प्रवास होता – विकी डोनर, बदलापूर, उरी, बाला, अ थर्सडे आणि आर्टिकल ३७० सारख्या चित्रपटांसह, जिथे प्रत्येक भूमिकेने तिच्या कलाकृतीत एक नवीन थर जोडला आहे. सार्वजनिकरित्या शिकलेल्या परंतु खासगीरित्या विकसित झालेल्या व्यक्तीकडून येणारा आत्मविश्वास तुम्हाला जाणवू शकतो.

आणि आता सह, ती वर्षाचा शेवट मोठ्या उत्साहात करते. गोंगाट करणारा नाही, तर एक प्रतिध्वनी सोडणारा. असा अभिनय जो चित्रपट संपल्यानंतरही बराच काळ तुमच्यासोबत राहतो, जो चित्रपट संपल्यानंतरही तुम्हाला तिच्याबद्दल खूप दिवस विचार करायला लावतो.यामीमध्ये एक गोष्ट खूपच दुर्मिळ आहे. ती आपल्याला आठवण करून देते की एखाद्या अभिनेत्याला ऐकू येण्यासाठी आवाज करण्याची गरज नसते. तो दृढनिश्चय शांत असू शकतो. आणि ताकद स्थिर असू शकते.

# दररोज ४ ते ५ लाख महिलांची ई-केवायसी, एक कोटी लाडक्या बहिणींनी केली ई-केवायसी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांना ई केवायसी प्रक्रिया १८ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करायची आहे. ही ई केवायसी पूर्ण करण्यासाठी आता ५ दिवसांचा वेळ शिल्लक राहिला आहे. लाडकी बहीण योजना महिला व बालविकास विभागाकडून जुलै २०२४ पासून राबवली जाते. या विभागाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी दररोज चार ते पाच लाख महिलांची ई केवायसी प्रक्रिया ही साईटवर पूर्ण होत आहे. आतापर्यंत साधारणपणे १ कोटी महिलांची ई केवायसी पूर्ण झाली असल्याची माहिती आदिती तटकरे यांनी दिली. यासोबतच ज्या महिलांच्या वडिलांचे किंवा पतीचे निधन झालं आहे, त्यांना येत असलेल्या अडचणींवर देखील मार्ग काढला जाणार असल्याचं सांगण्यात आलं आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या वेबसाईटवर ई केवायसी प्रक्रिया सुरु झाल्यानंतर ज्या महिला एकल आहेत किंवा ज्या महिलांच्या वडिलांचं आणि पतीचं निधन झालंय. ज्या महिला घटस्फोटित आहेत, अशा महिलांना ई केवायसी प्रक्रिया करता येत नव्हती. अखेर महिला व बालविकास विभागानं त्याची दखल घेतली आहे. आदिती तटकरे यांनी अशा महिलांसाठी वेबसाईटमध्ये तांत्रिक बदल करणार असल्याचं सांगितलं आहे. ज्यांच्या पतीचं निधन झालं आहे, ज्यांच्या वडिलांचं निधन झालं आहे किंवा घटस्फोटित असतील म्हणजेच एकल महिला असतील त्यांच्यासाठी वेबसाईटवर काम करत आहोत. या महिलांच्या पतीचं किंवा वडिलांचं निधन झालं असेल तर त्याचं मृत्यू प्रमाणपत्र अपलोड करणे आणि घटस्फोटित महिलांसाठी घटस्फोटाचे कागदपत्रं अपलोड करण्यासंदर्भात वेबसाईटवर काही बदल करत आहोत, असं आदिती तटकरे यांनी बुधवारी माध्यमांसोबत बोलताना सांगितलं.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र महिला लाभापासून वंचित राहणार नाहीत यासाठी काम करत आहोत. १८ नोव्हेंबरपर्यंत ई केवायसीची प्रक्रिया करायची आहे. जो मधल्या कालावधीत पाऊस झाला, मराठवाडा, पश्‍चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. त्या पुराच्या परिस्थितीत अनेकांना कागदपत्रं गमवावी लागली. त्यासंदर्भातील निर्णय घेणं, मुदतवाढ देणे ते आम्ही निश्‍चित करणार आहोत. कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता नक्कीच घेणार असल्याचं आदिती तटकरेंनी म्हटलं आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ऑक्टोबर महिन्याच्या हप्त्याची रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. आता लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांचं लक्ष ई केवायसीच्या मुदतवाढीकडे लागलंय.

## माढ्याचे चार सुपुत्र एकाचवेळी उपजिल्हाधिकारी! गावाची मान उंचावली, पदोन्नतीमुळे माढा पुन्हा एकदा चर्चेत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शासनाच्या वतीने नुकतेच तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली असून, माढा तालुक्यातील चार तहसीलदार एकाच वेळी उपजिल्हाधिकारी बनले आहेत. दुष्काळी अशी ओळख असणाऱ्या माढा तालुक्यातील तरुणांनी गेल्या दोन दशकापासून स्पर्धा परीक्षेत आपले नशीब आजमावले आणि आज तालुक्यातील अनेक तरुण केंद्रीय आणि राज्य स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन मोठमोठ्या अधिकारी पदावर बसलेले आहेत. काल झालेल्या पदोन्नतीमध्ये एकाच तालुक्यातील चार सुपुत्रांना हा पदोन्नतीचा लाभ मिळाला आहे. दुष्काळी आणि शेतीप्रधान असा लौकिक असलेल्या माढा तालुक्यातील तरुणांनी गेल्या दोन दशकांपासून स्पर्धा परीक्षेत मोठ्या प्रमाणावर यश मिळवले आहे. ग्रामीण भागातील या तरुणांनी मेहनत, चिकाटी आणि जिद्द यांच्या जोरावर राज्य व केंद्र सेवांमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आता या चार अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीमुळे माढा तालुक्याने पुन्हा एकदा अभिमानाने मान उंचावली आहे. वेताळवाडीचे सुपुत्र किरण सुरवसे यांची उपजिल्हाधिकारी पदावर सोलापूर येथे नियुक्ती झाली आहे. सध्या ते हवेली येथे तहसीलदार म्हणून कार्यरत होते. २००४ साली नायब तहसीलदार म्हणून प्रशासनात प्रवेश घेतलेल्या सुरवसे यांनी रायगड, ठाणे आणि पुणे जिल्ह्यात उल्लेखनीय सेवा बजावली आहे. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल गावकऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दारफळ सिना येथील प्रदीप उबाळे यांची नागपूर येथे भूसंपादन उपजिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. ते याआधी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात तहसीलदार म्हणून कार्यरत होते. २०१४ साली राज्यसेवेत तहसीलदार म्हणून उत्तीर्ण झालेल्या उबाळेंनी अल्पावधीतच आपल्या कामगिरीने प्रशासनात चांगली छाप सोडली आहे.निमगाव (टे) चे सुपुत्र गणेश शिंदे सध्या बारामती येथे तहसीलदार म्हणून कार्यरत होते. त्यांची धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे प्रांतधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. २००७ साली नायब तहसीलदार म्हणून सेवा सुरू केलेल्या शिंदेंनी विदर्भ, सांगली आणि बारामती भागात उत्कृष्ट कार्य केले आहे.

## परवानाधारकाकडील शस्त्रे पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्याचे जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे निर्देश

### शस्त्रे जमा करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील परवानाधारकाकडे असलेले शस्त्रे जमा करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना छाननी समितीने जाहिर केले आहे. त्याअनुषंगाने मार्गदर्शक सूचनाचे पालन करुन परवानाधारक व्यक्तींनी आपली शस्त्रे त्वरीत पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्याचे निर्देश जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमीत केले आहेत.

छाननी समितीने जाहिर केलेले मार्गदर्शक सूचना : बँक, संस्था,सोनार,देवस्थान आणि पेट्रोलपंप धारक यांचेकडे असलेले शस्त्रपरवाने निवडणूक कालावधीत जमा करण्याची आवश्यकता नसल्याचे समितीने निर्णय घेतला आहे. नगरपालीका/नगरपरीषद क्षेत्रातील शस्त्रपरवानाधारक यांचेकडून शस्त्रे जमा करावी. याव्यतिरिक्त निवडणूकीच्या कालावधीमध्ये शस्त्र जमा करण्यापासून सुट देण्याबाबत शस्त्र परवानाधारक यांचेकडून विनंती अर्ज प्राप्त झाल्यास पोलीस विभागाने शस्त्र परवानाधारक यांना सूट देण्याची आवश्यकता आहे किंवा कसे ? याबाबत सखोल पडताळणी करून त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्ज निर्णयार्थ छाननी समिती समोर सादर केल्या जाईल.

जे शस्त्र परवानाधारक गंभीर स्वरुपाचे गुन्ह्यात(भारतीय दंड संहिता मधील सर्व प्रकारचे गुन्हे) इत्यादी गुन्ह्यात अडकलेले आहेत व त्यांना जामीनावर सुटका मिळालेली आहे अशा परवाना धारकांकडून कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही यासाठी त्यांच्याकडील शस्त्र तात्काळ जमा करावी. ज्या शस्त्र परवाना धारकांना अपराधाची पार्श्वभूमी आहे. तसेच कोणत्याही निवडणूकी दरम्यान घडलेल्या दंगलीमध्ये कायदा व सुव्यवस्था भंग करण्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभागी असलेल्या शस्त्र परवानाधारकाचे देखील शस्त्रे पोलीस विभागाकडून जमा करण्यात यावे.

# निवडणुकीच्या अनुषंगाने न प ढाणकी येथे पत्रकार परिषद

## निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली निवडणूक कार्यक्रमाबद्दल माहिती

दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** ढाणकी नगरपंचायतची निवडणूक येत्या २ डिसेंबर रोजी होणार आहे. त्या अनुषंगाने प्रशासन सज्ज झालेले आहे. निवडणुकीदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही यासाठी निवडणूक आयोग प्रत्येक घटनेवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

आज दिनांक १३ नोव्हेंबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी राजेश सुरडकर, सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी अरुण मोकळे, नोडल अधिकारी अन्वय पाटील यांनी नगरपंचायत कार्यालय येथे पत्रकार परिषद आयोजित केली होती. सदर पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी निवडणुकीबाबत माहिती दिली. नगरपंचायत निवडणुकीची सविस्तर रूपरेषा त्यांनी यावेळी मांडली. निवडणूक काळा दरम्यान कोणताही गैरप्रकार आढळल्यास प्रशासनाशी संपर्क साधण्याचे त्यांनी यावेळी आवाहन केले. १७ प्रभागासाठी एकूण १७ मतदान केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. निवडणुकीनंतर मतमोजणी ही शासकीय गोदाम ढाणकी येथे होईल. नामांकन अर्ज भरणे सुरू झालेले असून अद्याप एकही उमेदवारांनी आपला अर्ज दाखल केलेला नाही. नामांकन अर्ज भरण्याची शेवटची तारीख ही १७ नोव्हेंबर ही आहे. तसेच उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेण्याची तारीख २१ नोव्हेंबर अशी आहे.

तसेच उमेदवारांना २६ नोव्हेंबर पासून चार दिवस प्रचारासाठी मिळणार आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी राजेश सुरडकर यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. दिव्यांग मतदारासाठी विशेष सोय मतदान केंद्रावर करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मतदार यादीत जर मतदाराचे नाव नसेल तर त्यांना मतदान करता येणार नाही असे त्यांनी यावेळी सांगितले.

